

## रयत शिक्षण संस्थेचे

# आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज रामानंदनगर (बुर्ली)

## गीत गंधाली कार्यक्रम अहवाल दिनांक 31 ऑगस्ट 2019

रामानंद नगर येथील आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स या महाविद्यालयामध्ये दिनांक 31 ऑगस्ट 2019 रोजी गीत गंधाली हा संगीतमय कार्यक्रम घेण्यात आला. भारतीय संस्कृतीवर प्रकाश टाकणारा धार्मिक ग्रंथ रामायण यांचे गीतात रूपांतर करणारे ग. दि. माडगूळकर यांनी गीत रामायण जसे अस्तित्वात आणले. तसेच रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जीवनपटावर प्रकाश टाकणारा हा एकमेव संगीतमय कार्यक्रम रयत शिक्षण संस्थेच्या शताब्दी महोत्सवानिमित्त तयार करण्यात आला होता. तोच कार्यक्रम महाविद्यालयात घेण्यात आला. संगीतमय वातावरणात महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी उत्साहात होते.

रयत शिक्षण संस्थेच्या शताब्दी महोत्सवानिमित्त लोकनेते रामशेठ ठाकूर पुरस्कृत प्रसिद्ध गायक संभाजी पाटील प्रस्तुत व त्यांच्यासमवेत प्रज्ञा पाटील गायिका म्हणून होत्या. तर तबलावादक श्री. मल्हारी गजभारे व इतर सहाय्यक यांच्या कलापथकाने भारदस्त कार्यक्रम घेऊन सर्वांना मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमाची सुरुवात नटेश्वराच्या पूजनाने झाली. प्रास्ताविक महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. व्ही. बी पाटील यांनी केले. तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य डॉ.एल.डी. कदम हे होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला थोडासा बदल करून अध्यक्षीय समारोप घेण्यात आला. त्यानंतर कला सादर करण्यासाठी अधिकाधिक वेळ मिळावा असे नियोजन करण्यात आले. त्यानुसार मा. प्रा. संभाजी पाटील यांनी कर्मवीर अण्णांची कृतज्ञता व्यक्त करून कार्यक्रमाला सुरुवात केली. सर्वप्रथम “रयते मधुनी नव्या युगाचा माणूस आता घडतो आहे, वटवृक्षाच्या विशाल तिचा मोहन बाला पडतो आहे” हे रयत गीत सादर केले आणि कर्मवीर अण्णांच्या जीवनपटावर संगीतमय कार्यक्रम संपन्न झाला.

निष्पत्ती:1. संगीताच्या माध्यमाने कर्मवीर अण्णांचा परिचय झाला.

२. रयत शिक्षण संस्थेचा इतिहास व कार्य ज्ञात

लाभार्थी: महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर सेवक व सर्व विद्यार्थी







गायन करताना प्रा.संभाजी पाटील.

कार्यक्रमाचा आस्वाद घेताना महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य तसेच प्राध्यापक,विद्यार्थी व विद्यार्थिनी

प्रा. प्रतिभा पुदाले
चेअरमन,
सांस्कृतिक विभाग

प्राचार्य,
आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज रामानंदनगर (बुर्ली)